साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
०२०-२५५३८०४१ ते ४४, Ext.no.३१७ commsugarvikas@gmail.com

जा.क्र.साआ/विकास/गा.हं.२५-२६/रिफ्लेक्टर बोर्ड/५७०/२०२५ दिनांक : १० ऑक्टोबर, २०२५

## परिपत्रक

**विषय : सहकारी /खाजगी साखर कारखाने यांना ऊस वाहतुक करणारे ट्रक,ट्रॅक्टर-ट्रेलर बैलगाडी यांना रिफ्लेक्टर बोर्ड व रिफ्लेक्टीव टेप लावणे बाबत.**

साखर कारखान्यांवर ऊस वाहतूक करणा-या ट्रॅक्टर-टेलर, बैलगाडया, अंगद/जुगाड गाडया व ट्रक या वाहनांना रिफ्लेक्टर बोर्ड व रिफ्लेक्टीव टेप बसविणे केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १०४ नुसार नुसार बंधनकारक आहे. सदर रिफ्लेक्टर बोर्ड ट्रेलरला मागील बाजूस लाल रंगाचा अखंड व डाव्या आणि उजव्या बाजूस पिवळया रंगाचा तसेच पुढील बाजूस पांढ-या रंगाचा रिफ्लेक्टर बोर्ड बसविणे बंधनकारक आहे. वाहनांना रिफ्लेक्टर नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. नियमानुसार वाहनास रिफ्लेक्टर/रिफ्लेक्टीव टेप नसल्यास मोटार वाहन कायदयानूसार वाहनधारकास व मालकास दंड होऊ शकतो.

२/- राज्यातील ऊस गाळप हंगाम २०२५-२६ लवकरच सुरु होणार आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना पुढे व मागे रिफ्लेक्टीव्ह टेप न लावणे, एकापेक्षा जास्त ट्रेलर जोडून ऊसाची वाहतूक करणे, मागील वाहने पाहण्यासाठी आरसे न लावणे, मोठया आवाजामध्ये वहानामध्ये म्युझीक सिस्टम लावणे, चुकीच्या पध्दतीने ओव्हरटेक करणे, वाहने रस्त्याच्या कडेला उभी करणे व वाहनाच्या बॉडीबाहेर ऊस भरणे, शेतातून मुख्य रस्त्यावर इतर वाहनांचा अंदाज न घेता ट्रॅक्टर-ट्रेलर आणणे इत्यादी कारणांमुळे अपघात होऊ शकतात. ऊस वाहतूक करणारी वाहने रात्रीच्या वेळेत ऊस वाहतूक करतात काही वेळेला रात्रीच्या वेळी वाहने रस्त्याच्या कडेला उभी केली जातात. परंतू वाहनांना रिफ्लेक्टर नसल्यामुळे इतर वाहन चालकांना जवळ गेल्या शिवाय रस्त्यात नेमके काय थांबले आहे याचा अंदाज येत नाही. अशा वेळेस अचानक नजरेस न पडलेल्या वाहनांमुळे वाहन चालकांचा वाहनावरील ताबा सुटून अपघात होतात.

३/- गाळप हंगाम २०२५-२६ करीता आपल्या साखर कारखान्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-टेलर, बैलगाडया, अंगद/जुगाड गाडया व ट्रक या वाहनांना रिफ्लेक्टर बोर्ड बसविण्याची कार्यवाही ऊस वाहतूक करणाऱ्या वाहन मालकांनाकडून करून घ्यावी. तसेच ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना महामार्गावर जात असतांना ज्या महामार्गावर सर्व्हिस रोड आहेत, तेथे सर्व्हिस रोडचा वापर करण्यास तसेच ज्या महामार्गावर सर्व्हिस रोड नसेल त्या ठिकाणी महामार्गाचा वापर करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

तसेच परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर/ ट्रेलर/ बैलगाडी या वाहनांनी अपघात विरहित ऊस वाहतूक करण्याविषयी सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे साखर कारखान्यांकडून प्रबोधन करण्यात यावे.

१) ऊस वाहतुक ही ट्रॅक्टर, ट्रेलर व बैलगाडी या वाहनांतून प्रामुख्याने होत असते. अशी वाहने ही इतर वाहनांच्या तुलनेत अत्यंत कमी वेगाने प्रवास करीत असतात किंवा उभे असताना वाहने दृश्यमान नसल्यास रस्त्याने प्रवास

करणाऱ्या इतर वाहनांना त्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे ब्रेकींग डिस्टंस व स्टॉपिंग डिस्टंस यांचा मेळ न बसल्यामुळे ट्रेलरला मागून धडक बसून अपघात होण्याचा जास्त संभव असतो.

२) सदर वाहनांना पुढे व मागे रिफ्लेटर टेप न लावणे, वाहनांचा वेग, एकापेक्षा जास्त ट्रेलर जोडून ऊसाची वाहतूक करणे, मागील वाहने पाहण्यासाठी आरसे न लावणे, मोठ्या आवाजामध्ये वाहनात म्युझिक सिस्टीम लावणे, चूकीच्या पध्दतीने ओव्हरटेक करणे, वाहने रस्त्यांच्या कडेला उभी करणे व वाहनांच्या ट्रॉलीबाहेर ऊस भरणे, शेतातून मुख्य रस्तांवर इतर वाहनांचा अंदाज न घेता ट्रॅक्टर आणणे इ. कारणामुळे अपघात होऊ शकतात.

३) ग्रामिण भागामध्ये ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांची विशेषत: ट्रेलर नोंदणी झालेली आहे. तसेच चालकाकडे विधीग्राह्य कागदपत्रे (उदा. विमा, लायसन्स) असल्याची खात्री संबंधित साखर कारखान्यांनी त्यांचे स्तरावर करावी. भविष्यात काही अनुचित प्रकार घडल्यास वाहन मालक व अपघातग्रस्त व्यक्तीस विमा संरक्षण मिळू शकत नाही.

४) नोंदणी नसलेल्या ट्रॉली तसेच बैलगाडी ट्रॅक्टरला जोडून ऊसाची वाहतुक करू नये.

५) शेतात ऊसाचे वजन होऊ शकत नसल्याने बऱ्याच वेळा ट्रेलर्समधुन क्षमतेपेक्षा जास्त ऊस भरला जातो. यामुळे ट्रॅक्टर- ट्रेलर चालविताना वेगावर मर्यादा येते. तसेच ब्रेक लावल्यावर वाहन थांबण्याचे अंतरात वाढ होते. ट्रॅक्टर समोरुन उचलला जाण्याचीही शक्यता असते. सबब साखर कारखान्यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या ट्रेलर्सच्या अंतर्गत मोजमापानुसार क्षमतेपेक्षा जास्त भार होणार नाही अशा प्रकारे ऊस भरण्याची कमाल उंची निश्चित करुन घ्यावी.

मोटार वाहन कायद्यानुसार वाहतूक नियमांच्या पालनाची जबाबदारी चालक, मालक यासोबतच माल भरणाऱ्या कारखान्यांची सुध्दा आहे. त्यामुळे अपघात विरहीत ऊस वाहतूक करण्याकरीता ऊस वाहतूकदार वाहनमालक व चालक यांना वरीलप्रमाणे सुरक्षित ऊस वाहतुक करणेबाबत प्रबोधन करावे.

Digitally signed by
SANJAY GENDRAJ KOLTE
Date: 10-10-2025
13:43:23
(डॉ.संजय कोलते)
साखर आयुक्त

प्रति,

१) कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाने (सर्व)

२) जनरल मॅनेजर, खाजगी साखर कारखाने (सर्व)

प्रत :

१) प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)

२) प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)